# प्रेस नोट

# भंडारा जिल्हा पोलीस

# TECH EXPO 2018

## उद्घाटन कार्यक्रम

जा.क्र. १०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०२/२०१८

भंडारा:– दिनांक २४/०२/२०१८ ते २५/०२/२०१८ रोजी सायबर क्राईम, क्रिमीनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टम, ऑनलाईन तक्रार, व महिला विषयक गुन्हे बाबत जनजागृती करण्यासाठी पोलीस विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल, भंडारा येथे 'टेक्स एक्स्पो २०१८' प्रदर्शन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, उर्जा मंत्री, तथा पालकमंत्री भंडारा, मा. श्री. परिणय फुके, आमदर गोदिंया, भंडारा वि.स. क्षेत्र हे होते. मा. रामचंद्र अवसरे आमदार भंडारा, मा. चरन वाघमारे, आमदार तुमसर, मा. सुहास दिवसे जिल्हाधिकारी भंडारा, मा. सुनील मेंढे नगराध्यक्ष भंडारा, मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, एस.व्ही. कुलकर्णी, पोलीस उपअधीक्षक(गृह) भंडारा हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

सदर कार्यक्रमा दरम्यान मा. श्री. बावणकुळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भंडारा पोलीस दलाने अनेक अनेक उपक्रम राबविले आहेत. टेक एक्स्पो हे प्रदर्शन पोलीसांचे आधुनिकी करनाचे महत्व विषद करणारे आहे. भंडारा शहरातील गुन्हयांवर नजर ठेवण्यासाठी सर्वत्र सिसिटीव्ही लावण्यात येईल, याशिवाय तालुक्याचे शहर व मोठया गावात सिसिटीव्हीचे जाळे निर्माण केले जाईल, पोलीस विभागाचे आधुनिकरणाच्या दृष्टीने यापुढे निधी देण्यात येईल, असे ते बोलले विज चोरीचे गुन्हे सुध्दा आता पोलीस ठाण्यात नोंदवीण्यासाठी आदेश निर्गमीत झाला आहे. तसेच आमदार डॉ. परिणय फुके व जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांची समोयोचीत भाषणे झाली.

यावेळी टेक्स एक्स्पोच्या आयोजनाच्या मागची भुमीका मा. पोलीस अधिक्षक भंडारा यांनी आपल्या प्रास्ताविकातुन मांडली. शासनाने तंत्रज्ञानाचा अधिकाअधिक वापर केला असुन तंत्रज्ञान व सोशल मिडीया मध्ये घडणाऱ्या गुन्हयापासुन संरक्षण व्हावे. याबाबतची माहिती या प्रदर्शनाच्या माध्यमातुन जनतेला दिली जाणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल, भंडारा येथील प्रदर्शनी मध्ये फिरते पोलीस स्टेशन, सायबर पोलीस स्टेशन, ऑनलाईन सुरक्षा, पोलीस मुख्यालय, बॉम्ब शोधक व नाशक पथक, वाहतुक नियत्रंण शाखा, बिनतारी संदेश विभाग, अंमली पदार्थ विरोधी शाखा, महिला सुरक्षा विशेष कक्ष, अंगुली मुद्रा, ॲन्टी नक्षल सेल, दामीनी पथक, फॉरेन्सिक टेक्नॉलॉजी नागपुर, लोकराज्य, जिल्हा महिला व बाल विकास भंडारा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पांडव इंजिनियरींग कॉलेज शहापुर, एक्सीस बैक भंडारा, डोअर सेक्युरीटी इत्यादी स्टॉल

लावुन त्याव्दारे वेगवेगळया विषयाची माहीती देण्यात आली. तसेच ऑनलाईन फोनव्दारे तसेच फेसबुक, व्हॉस्टअप, इ. माध्यमातुन नागरीकांची फसवणुक कशी होते. याबाबत पथनाट्यातुन जनजागृती करण्यात आली. वेगवेगळया सायबर क्राईम बाबत नागरिकांना माहिती नसते, या सर्व बाबींची माहिती जनतेला मिळावी, कामकाजात सुसुत्रता आणि पारदर्शकता यावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी आयोजीत कार्यक्रमाला हजर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जोगदंड भंडारा, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. डिसले साकोली, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. टिक्कस पवनी, पोनी. घुसर, पोनी. तेलुरे, पोनी. सिडास, पोनी. मानकर, पोनी. कंकाळे, राखीव पोलीस निरीक्षण वर्मा, मपोउपनी. लांजेवार, कार्यक्रमास पोलीस अधिकारी/कर्मचारी, पोलीस मित्र, पत्रकार बंधु व प्रचंड संख्येने नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मुंकुद ठवकर व स्मिता गालफाडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांनी केले.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.